# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८,
## वैद्यकीय विभाग
## सभावृत्तांत

दिनांक – १३/०३/२०१८

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विविध विषयांवर चर्चा करणेकामी त्रैमासिक आढावा बैठक दि.१२/०३/२०१८ रोजी स.११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. श्रावण हर्डीकर, आयुक्त तथा अध्यक्ष
२. डॉ. प्रविण अष्टीकर, अति.आयुक्त तथा उपाध्यक्ष
३. श्री. बबनराव झिंझुर्डे, अध्यक्ष, कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष
४. डॉ. के अनिल रॉय, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष
५. श्री. राजेश लांडे, मुख्यलेखापाल तथा सदस्य
६. श्रीमती पद्मश्री तळदेकर, मुख्यलेखापरिक्षक तथा सदस्य
७. श्री. चंद्रकांत इंदलकर, सहा.आयुक्त
८. ऍड. सर्जेराव लावंड, कायदा अधिकारी
९. श्री. मनोज माछरे, सहखजीनदार, कर्मचारी महासंघ तथा सदस्य
१०. श्रीमती रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी (महिला) तथा सदस्य

सदर बैठकीमध्ये विषयपत्रिकेत नमूद करण्यात आलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने चर्चा करण्यात आलेली असून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. श्री.पोपट जगन्नाथ कदम, उपलेखापाल यांचेमार्फत सादर करण्यात आलेले त्यांचे आईचे उपचारापोटीचे बिल दि.११/०४/२०१७ रोजी नामंजूर करण्यात आलेले आहे. सदर कर्मचा-याने दि.१८/०५/२०१७ रोजी प्रस्तुतचे बिल पुनःश्च फेरसादर केलेले आहे. तथापि, सदर रुग्णांस काटकर हॉस्पीटल, वडूज, ता.खटाव येथे दाखल करण्यात आलेले असून त्याचे निदान Pneumonitis असे करण्यात आलेले आहे. मात्र रिपोर्टचे अवलोकन करता सदर आजार रुग्णांस असल्याचे सिध्द होत नाही. तसेच रुग्णांचा चेस्ट एक्सरे देखील तसे दर्शवत नाही. सबब, श्री.कदम यांची मागणी मान्य करता येणार नाही. यास्तव सदरचे बिल नामंजूर करण्यात येत आहे.

२. श्री.राम लिंगप्पा तेलंगी, रखवालदार यांनी त्यांचे मुलाला कवडे नर्सिंग होम, उत्तमनगर, पुणे येथे दाखल केलेले होते. सदर रुग्णांस Thrombocytopenia असल्याचे निदान झालेले आहे. त्यापोटी सादर करण्यात आलेले बिल दि.१९/१०/२०१६ रोजी नामंजूर करण्यात आले असता श्री.तेलंगी यांनी पुन:श्च दि.३/१२/२०१६ रोजी बिल फेरसादर केलेले आहे. तथापि, Thrombocytopenia हा आजार तातडीचे स्वरुपात येत नाही. तसेच श्री.तेलंगी यांनी ११६ तासांचे आंत रुग्ण दाखल केल्याची बाब विभागास कळविलेली नाही. यास्तव श्री.तेलंगी यांची मागणी अमान्य करुन बिल नामंजूर करण्यात येत आहे.

३. श्रीमती वंदना दिपक कुंभार, लिपीक यांनी त्यांचे पतीचे केईएम रुग्णालयातील उपचाराचे बिल नामंजूर केल्यामुळे फेरमंजूरीकामी अर्ज सादर केला आहे. श्रीमती कुंभार यांनी त्यांचे पतीस उपचारार्थ दाखल केले त्यावेळी त्यांचे पतीचे नाव धन्वंतरी योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेले नव्हते. तसेच धन्वंतरी धोरणातील मुद्दा क्र. १२(अ) प्रमाणे त्यांनी ११६ तासांचे आंत विभागास कळविलेले नाही. यास्तव प्रस्तुतचे बिल नामंजूर करण्यात येत आहे.

४. श्री.नंदकुमार तुकाराम वाघेरे, शिपाई यांनी त्यांचे स्वत:चे उपचारापोटी एन.एम.वाडीया इन्स्टीट्युट ऑफ कार्डिओलॉजी येथे बायपास सर्जरी केलेली आहे. श्री.वाघेरे हे पिंपरी येथील रहिवाशी असून त्यांनी पुण्यातील रुग्णालयामध्ये उपचार घेतलेले आहेत. तसेच सदर रुग्णालय हे धन्वंतरी योजेनेचे पॅनलमध्ये नसून त्यांनी ११६ तासांचे आत विभागास कळविलेले नाही. धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयांव्यतिरिक्त अन्य रुग्णालयांमध्ये करण्यात येणा-या उपचारांकरिता करावयाच्या प्रतिपूर्तीसंबंधी धोरण निश्चित करुन त्याचा योजनेमध्ये समावेश करणे आवश्यक आहे. जेणेकरुन अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये बिलांची अदायगी करणे शक्य होऊ शकेल. यास्तव अशा प्रकारे प्राप्त होणा-या बिलांची पडताळणी करुन एकूण बिलाच्या रकमेच्या ५०% अथवा धन्वंतरी योजनेमध्ये होणा-या खर्चाच्या देय रकमेच्या ७५% यापैकी जी रक्कम किमान असेल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती संबंधित कर्मचा-यास करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यामध्ये राज्य शासनामार्फत निश्चित करण्यात आलेल्या

फक्त ६ प्रमुख आजारांचा समावेश राहील. सदर अटीचा समावेश धन्वंतरी योजना धोरण २०१३ मध्ये करणेकामी मा.महापालिका सभेपुढे विषयपत्र सादर करण्यात यावे व सदर विषय मान्य झाल्यानंतर श्री.वाघेरे यांचे बिल मंजूरीकामी अलाहिदा निर्णय घेण्यात यावा.

५. श्री.उत्तम देवराम गवळी, आरोग्य मुकादम यांनी एन.एम.वाडीया इन्स्टीट्युट ऑफ कार्डिओलॉजी, पुणे येथे घेतलेल्या उपचारापोटी नामंजूर करण्यात आलेले बिल मान्यतेकामी फेरसादर केलेले आहे. सदर बिलाची अदायगी वर नमूद केलेल्या तरतूदीनुसार मा.महापालिका सभेमार्फत मान्यता मिळाल्यानंतर करण्यात यावी.

६. श्री.अमोल चंद्रकांत वाघेरे, लिपीक यांनी Venous sinus Thrombosis चे आजाराकरिता निरामय हॉस्पीटल, मॅक्स न्युरो हॉस्पीटल व रुबी हॉल, पुणे या पॅनलवर नसलेल्या रुग्णालयांमध्ये उपचार घेतलेले असून त्यांचे नामंजूर केलेली बिले पुन:श्च सादर केलेले आहेत. सदर बिलाची अदायगी वर नमूद केलेल्या तरतूदीनुसार मा.महापालिका सभेमार्फत मान्यता मिळाल्यानंतर करण्यात यावी.

७. श्री. राजू किसनचंद चंदिरामाणी, मुख्य लिपीक यांना आदित्य बिर्ला रुग्णालयामार्फत रेफर केल्यानुसार त्यांनी ग्लोबल हॉस्पीटलमध्ये उपचार घेतलेले आहेत. सदर रुग्णालयातील उपचारापोटी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करुन देण्यात आलेली आहे. तथापि, त्यानंतर श्री. चंदिरामाणी यांनी स्वत:च्या इच्छेनुसार ग्लोबल हॉस्पीटल येथून डिस्चार्ज घेवून ते ज्युपीटर हॉस्पीटल येथे दाखल झालेले होते. सदर हॉस्पीटल पॅनलवर नसून त्याठिकाणी त्यांना रेफरदेखील करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे त्यांचेमार्फत सादर करण्यात आलेले ज्यूपीटर हॉस्पीटलचे बिल नामंजूर करण्यात आलेले आहे. सदर बिल मंजूरीकामी त्यांनी पुन:श्च प्रकरण सादर केलेले आहे. सबब, सदर बिलाची अदायगी वर नमूद केलेल्या तरतूदीनुसार मा.महापालिका सभेमार्फत मान्यता मिळाल्यानंतर करण्यात यावी.

८. धन्वंतरी योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या chronic myeloid leukemia संदर्भातील तपासण्यांकरिता प्राप्त झालेल्या बिलांचे अदायगीकामी दर निश्चित नसल्यामुळे इतर रुग्णालयांकडून माहिती घेवून अंदाजित दर निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर तपासण्या ह्या पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील रुग्णालयांमध्ये करण्यात येत नाही. त्यामुळे सदर तपासण्यांकरिता खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात येत आहेत.

| **Sr.No.** | **Test** | **Amount** |
|---|---|---|
| 1 | Quantitative Immunoglobulins IgG,IgA,IgM (serum) | Approx Rs 600-700/- per immunoglobulin (IgG,IgA,IgM) |
| 2 | RT PCR (BCR ABL-Major) t(9;22) breakpoint | Approximately Rs 9000/- |
| 3 | VNTR Marker screening – Per BMT | Approximately 7000/- 11000/- |

९. संत ज्ञानेश्वर रुग्णालय, मोशी येथे डायलिसीस करिता दाखल असलेल्या ४ रुग्णांसंदर्भात रुग्णालयामार्फत वेळोवेळी महापालिकेस कळविणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर थेट बिले सादर केलेली असून त्यांना रुग्णालयाचे मॅनेजमेंट बदलल्यामुळे सदर प्रक्रियेबाबत माहिती नसल्याचे त्यांनी कळविलेले आहे. यास्तव सदर रुग्णालयाने सादर केलेल्या बिलांपैकी १० टक्के रक्कम दंड म्हणून वसूल करुन त्यांना बिलाची अदायगी करण्यात यावी.

१०. श्री.कारभारी लक्ष्मण टिळेकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी त्यांचे आईचे उपचार धन्वंतरी योजनेअंतर्गत करण्यात न आल्यामुळे योजनेतून त्यांचे सभासदत्व रद्द करणेबाबत मागणी केलेली आहे. वास्तविकरित्या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता सदरची योजना ऐच्छिक स्वरुपाची असून अशा कर्मचा-याचे पती / पत्नीस फक्त सदर योजनेचा लाभ देय आहे. त्यामुळे श्री.टिळेकर यांचे आईचे उपचार सदर योजनेअंतर्गत करता येणार नाही. तरी श्री.टिळेकर यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचे सभासदत्व रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. श्रीमती पद्मश्री तळदेकर, मुख्यलेखापरिक्षक यांना त्यांचे पतीचे उपचारापोटी झालेल्या खर्चाचे र.रु.७०,०००/- पैकी धन्वंतरी योजनेतील तरतूदीनुसार र.रु.३६,०००/- इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करुन देण्यात आलेली आहे. तथापि, श्रीमती तळदेकर यांनी त्यांचेमार्फत खर्च करण्यात आलेल्या बिलाची प्रतिपूर्ती ही शासनाचे प्रतिपूर्ती धोरणानुसार करुन देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. मुख्यलेखापाल यांनी शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांना शासनाचे धोरणानुसार प्रतिपूर्ती करणे बंधनकारक असल्याचे नमूद केलेले आहे. सबब, यापुढे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण लागू करण्याऐवजी शासनाकडील प्रतिपूर्तीचे नियमानुसार वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती करुन देणेबाबत प्रशासन विभागामार्फत मा.महापालिका सभेपुढे सदरचा विषय मान्यतेकामी सादर करण्यात यावा.

रेखा गाडेकर
प्रशासन अधिकारी
सदस्य

ॲड.सर्जेराव लावंड
कायदा अधिकारी
सदस्य

मनोज माछरे
सहखजीनदार, कर्मचारी महासंघ
तथा सदस्य

चंद्रकांत इंदलकर
सहा.आयुक्त
तथा सदस्य

पद्मश्री तळदेकर
मुख्यलेखापरिक्षक
तथा सदस्य

राजेश लांडे
मुख्यलेखापाल
तथा सदस्य

बबनराव झिंझुर्डे
अध्यक्ष, कर्मचारी महासंघ
तथा उपाध्यक्ष

डॉ.के अनिल रॉय
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
कार्याध्यक्ष

डॉ.प्रविण अष्टीकर
अति.आयुक्त
तथा उपाध्यक्ष

श्रावण हर्डीकर
आयुक्त
तथा अध्यक्ष